# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर

## प्रेस नोट

दिनांक १९-०१-२०१८

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १-७-२०१६ अन्वये, सर्वसमावेशक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयातील नियम ४ (पाच) नुसार खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वीच सुधारित तरतुदींनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. वरील प्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडली नसल्यास, सदरहू शासन निर्णयातील नियम ६ (आठ) (नऊ) नुसार सदरहू उमेदवाराचा खेळाडू संवर्गातून विचार करता येत नाही.

सन २०१८ ची पोलीस शिपाई भरती प्रक्रियेसाठी जाहिरात दिनांक ५-२-२०१८ रोजी प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. तरी खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधित विभागीय उपसंचालक यांच्या कडून पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ५-२-२०१८ पूर्वी प्राप्त करुन घ्यावा.

खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधित विभागीय उपसंचालक यांच्या कडून पडताळणी केल्याबाबतचा विहित कालावधीतील प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत नसल्यास अर्जदाराचा खेळाडू संवर्गातून विचार करण्यात येणार नाही.

19/01/18

**( प्रदिप चव्हाण )**
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर